

# ८ मार्चच्या निमित्ताने

## ८ मार्च इतिहासाच्या निर्मात्या स्त्रिया

८ मार्च १९०८ ला न्यूयार्कमध्ये कपडे तयार करण्याच्या कारखान्यातील स्त्रियांनी प्रचंड निदर्शने केली. या काळात स्त्रियांना मतदानाचा हक्कही नव्हता. या स्त्रियांना अंधाऱ्या कोंदट जागेमध्ये १२-१२ तास काम करावं लागायचं. स्त्रियांची बाजू घेऊन संसदेमध्ये कोणीही भांडत नव्हते. शेवटी मतदानाच्या हक्काची आणि कामाचे तास कमी करण्याची मागणी करत या स्त्रिया रस्त्यावर आल्या. ८ मार्चला सगळे न्यूयॉर्क शहर घोषणांनी दणाणून गेलं. ही प्रचंड निदर्शनं पाहून, स्त्रियाही रस्त्यावर येऊ शकतात हे पाहून त्यापासून स्फूर्ती घेऊन अमेरिकेमध्ये अन्य ठिकाणी निदर्शनांची मालिकाच सुरू झाली. अनेक देशातल्या स्त्रियांना ८ मार्चची निदर्शने प्रेरणादायक वाटली. या काळात लोकशाहीवादी म्हणवून घेणाऱ्या देशामध्येही स्त्रीचा सर्वसामान्य नागरिक म्हणून घटनेमध्ये समावेश नव्हता. देशाच्या दैनंदिन कारभारात स्वत:चे मत नोंदविण्याची पात्रताच जणू तिच्यामध्ये नाही अशी प्रवृत्ती होती. त्यामुळे या निर्शदनाने बरीच खळबळ माजविली. दोनच वर्षांनी कोपनहेगनला जगातल्या अनेक देशांतल्या स्त्रियांची एक परिषद भरली होती. स्त्रियांना मतदानाचा हक्क नाकारला जातो, १२-१२ तास त्यांना राबवून घेतले जाते याविरुद्ध आंदोलने संघटित करण्यासाठी या परिषदेत विचारविनीमय झाला. तिथे एक सूचना मांडली गेली की ८ मार्च ला आता लढाऊ संदर्भ मिळाला आहे. तेव्हा तो आंतरराष्ट्रीय महिला दिवस म्हणून पाळण्यात यावा. जर्मनीच्या स्त्रीमुक्ती चळवळीतील कार्यकर्ती क्लारा झेटकीन हिने तर ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिवस का पाळला गेला पाहिजे हे सगळ्यांना पटवून दिले. आणि १९१० पासून जगभर ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. ८ मार्च हा महिला दिवस स्त्रियांच्या पुढाकाराने—कष्टकरी स्त्रियांच्या पुढाकाराने ठरला ही गोष्ट अतिशय महत्वाची आहे. पुढे पुढे तर स्त्रिया ८ मार्च नुसता साजरा करीत नसत तर त्यादिवशी निदर्शने करून मागण्या पुढे आणत. आंदोलनाची सुरवात ८ मार्च पासून करत.

८ मार्चच्या आजपर्यंतच्या इतिहासात दोन ८ मार्च तर अतिशय महत्वाचे आहेत. सत्तेची हाव असलेले सधन युध्दे खेळतात आणि यामध्ये भरडली जाते ती सर्व सामान्य जनता. युद्धाच्या काळात भाव वाढ, वस्तूची टंचाई, बेकारी व अन्य सामाजिक प्रश्न वाढतात आणि स्त्रीला या सर्व गोष्टींना तोंड द्यावे लागते. १९१४ मध्ये जर्मनीच्या युद्ध खोर धोरणाचा निषेध

कामाच्या ओझ्यापासून सुटका व्हावी, अशी मागणी करतात, तेव्हा त्या भांडवली रचनेसच आव्हान देत असतात. कारण भांडवली रचना सर्वांना रोजगार देऊच शकत नाही आणि घरकामात गुंतलेल्या स्त्रियांच्या बिनपगारी श्रमावर ही रचना अवलंबून आहे. आम्हाला जुळवलेली लग्ने नकोत, हुंडा पद्धत नष्ट झाली पाहिजे, अशा मागण्या ज्यावेळी स्त्रिया करतात त्यावेळी त्या सरंजामी व जातीय रचनेच्या उरल्यासुरल्या सर्व अवशेषांना आव्हान देतात.

भांडवली विचाराचे पुढारी स्त्रियांनी फक्त सामाजिक सुधारणासाठीच लढावे, असे म्हणून त्यांच्या लढ्यावर मर्यादा घालतात. स्त्रियांनी सर्वप्रकारच्या नोकऱ्या कराव्यात पण 'पत्नी व माता' म्हणून आपली जुनी भूमिकाही पार पाडावी असे म्हणतात. अशा मार्गाने स्त्रियांची मुक्ती होणे शक्य नाही.

सामाजिक क्रांतीसाठी झगडण्याशिवाय स्त्रियांना स्वातंत्र्य प्राप्त होणार नाही म्हणून स्त्रियांची मुक्ती हा सामाजिक क्रांतीचा एक घटक आहे. त्याचबरोबर पुरुषांनी हेही ध्यानात ठेवले पाहिजे की स्त्रिया ह्या एका विशेष रीतीने दडपल्या गेल्या आहेत. म्हणून ज्या प्रमाणात क्रांती त्यांना त्यांच्यावर होणाऱ्या दडपणूकीपासून मुक्ती मिळवून देईल, त्याप्रमाणात त्याही सामाजिक क्रांतीच्या कार्याला हातभार लावू शकतील. मुक्तीसाठी स्त्रियाना क्रांतीची जरूरी आहे, आणि क्रांती यशस्वी होण्यासाठी तिला स्त्रियांची जरुरी आहे.

## स्त्री संघटना उभारण्याची तत्त्वे

**पुरुषप्रधान समाजव्यवस्थेमुळे स्त्रियांची विशेष दडपणूक होत असल्यामुळे स्त्रियांच्या अशा खास संघटनेची जरूरी आहे.** अशी संघटना ही व्यापक जनसंघटना असावी. एखादा पक्ष अथवा एखादी राजकीय विचारसरणी मानणाऱ्या स्त्रियांपुरते तिचे स्वरूप मर्यादित नसावे, तर सर्वसाधारण क्रांतीकारक लढ्याशी सहकार्य करून स्त्रियांच्या मुक्तीसाठी लढू इच्छीणाऱ्या सर्व स्त्रिया अशा संघटनेत असाव्यात. अशी संघटना फक्त कामगार स्त्रिया अथवा शेतकरी स्त्रिया यापुरती मर्यादित नसावी. स्त्रिया म्हणून दडपल्या जाणाऱ्या सर्व स्त्रियांचे प्रश्न या संघटनेने हाती घ्यावेत.

पण त्याच वेळी स्त्रियांमध्येही वर्गभेद आहेत, विसरण्यात येऊ नये. मध्यमवर्गातील स्त्रियांचीही दडपणूक होते, पण तिचा प्रकार कामगारवर्गातील स्त्रियांच्या दडपणुकीपेक्षा वेगळा असतो. केवळ गृहिणी म्हणून असणाऱ्या स्त्रिया याही दडपल्या जातात. पण घराबाहेर जाऊन काम करणाऱ्या स्त्रियांवर होणाऱ्या दडपणुकीपेक्षा यांच्यावर होणाऱ्या दडपणुकीचे स्वरुप वेगळे असते. श्रमिक स्त्रिया ह्या दोन रीतीने दडपल्या जातात, तर दलित स्त्रियांना आपले प्रश्न हे जातीय भेदभावाच्या प्रश्नाशी निगडीत झाले आहेत असे दिसून येते. **स्त्रियांच्या संघटनेने या सर्व निरनिराळ्या प्रकारच्या फरकांची नोंद घेतली पाहिजे.**

कष्टकरी स्त्रिया दुहेरी रीतीने दडपल्या जात असल्याने त्या लढाऊ असतील व कोणत्याही चळवळीत त्यांची भागीदारी अत्यंत मोलाची ठरेल. त्या सामाजिक उत्पादनात भाग घेत असल्याने त्यांना सामुदायिक शिस्त आणि एकजूट व लढा यांचे सामर्थ्य ठाऊक झालेले असते. **म्हणून कष्टकरी स्त्रियांना अशा व्यापक स्त्री संघटनेत नेतृत्वाची भूमिका पार पाडणे शक्य आहे.**

शिवाय शेतकरी स्त्रिया व खालच्या जातीतील स्त्रिया यांचे मध्ये जास्त समानतेचे संबंध असण्याची परंपरा टिकून राहिली असल्यामुळे अशा स्त्रियांपासून मध्यमवर्गीय स्त्रियांना बरेच काही शिकता येईल. स्त्रिया या 'दुर्बल' आहेत, 'अबला' आहेत, त्या पुरुषांवर अपरिहार्यपणे अवलंबून आहेत, हे स्त्रियांचे नैसर्गिक विशेष नव्हेत हे त्यांना अशा स्त्रियांपासून शिकता येईल.

**स्त्रियांच्या संघटनेत कष्टकरी स्त्रियांना पुढाकार घेता यावा, विश्लेषण करण्याची क्षमता यावी म्हणून या संघटनेतील सुशिक्षित घटकांनी खास प्रयत्न केले पाहिजेत. पण त्याचबरोबर अशा सुशिक्षित स्त्रियांनी या कष्टकरी स्त्रिया व खालच्या जातीतील स्त्रिया यांचेपासून शिकण्याची वृत्तीही सततपणे बाळगली पाहिजे.** अशा रीतीनेच जनसमूहातून खरेखुरे व्यापक नेतृत्व निर्माण होईल.

— डॉ. गेल ऑम्वेट

धुता व दुसऱ्या दिवशी ती परत खराब होतात. कामगार ज्याप्रमाणे यंत्रे, इंजिने, मोटारी व इतर काही काळ टिकणाऱ्या उपभोग्य वस्तू निर्माण करतो आणि त्या विकल्या जातात, ह्या अर्थाने गृहिणी काही टिकाऊ उत्पादन करत नाहीत. भांडवलशाहीत घरकाम हे उत्पादक श्रम मानले जात नाहीत. आणि ह्यामुळे घरकाम ही दुय्यम दर्जाची किंबहुना क्षुल्लक बाब समजली जाते. अशा रीतीने घरकाम हे कनिष्ठ दर्जाचे ठरले की स्त्रियांचा दर्जाही कनिष्ठ ठरतो.

## घरकामाचा अर्थ

कामगाराला मिळत असलेले शिक्षण व प्रशिक्षण सोडले तर 'श्रमशक्तीचे' पुनरुत्पादन करण्यासाठी आवश्यक असलेले मूलभूत श्रम म्हणजेच स्त्रीचे काम होय. घर व मुले यांची काळजी घेणे व नवऱ्याची सेवा करणे ह्याचा नेमका अर्थ भांडवली समाजरचनेस कामगार मिळावेत म्हणून श्रमशक्तीचे उत्पादन व पुनरुत्पादन करणे, हा होय. अशा रीतीने स्त्रीचे काम हे जात्याच जरी उत्पादक नसले तरी भांडवलदाराचा नफा निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेल्या कामगारांच्या क्षमतेसाठी ते काम आवश्यक बाब आहे. भांडवलशाहीने स्त्रियांना समानता दिलेली नाही. लिंगभेदावर आधारलेली श्रमविभागणी नष्ट केलेली नाही. खरे म्हणजे भांडवलशाही ती नष्ट करू शकत नाही. भांडवलदारासाठी कामगार जे ८ ते १० तास राबतो त्या वेळाव्यतिरिक्त इतर वेळात त्याच्या जीवनाची जबाबदारी घेण्यास भांडवली व्यवस्था तयार नसते आणि कुटुंबाची 'पुनरुत्पादनाची' सर्व जबाबदारी घेण्यास शासन तयार नसते; म्हणून अमेरिकेसारख्या अत्यंत विकसित भांडवली समाजामध्ये कुटुंब व स्त्रीचे कुटुंबातील 'स्त्री'हे स्थान आदर्श धरले जाते.

ज्यावेळी भारतासारख्या वासाहतिक देशात भांडवली संबंध प्रवेश करतात, त्यावेळी ते कुटुंबाच्या क्षेत्रातील सरंजामी परंपरांना उचलून धरतात. भांडवली रोजगारासाठी स्त्रीने घर, कामगार व मुले संभाळून 'श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनाचे' कार्य पार पाडणे आवश्यक असल्याने ते तसे खात्रीपूर्वक घडावे म्हणून स्त्रीला पुरुषांच्या दास्यात जखडणाऱ्या व चूल आणि मूल हे तिचे सर्वस्व आहे असे तिला सांगणाऱ्या सरंजामी परंपरांना पाठिंबा देणे, हा मार्ग भांडवलशाहीस अत्यंत सोपा जातो. म्हणून भारतामध्ये जेथे स्त्रिया काम करत नाहीत अशा समाजाच्या मध्यम थरात (म्हणजे कुशल कामगार व सुशिक्षित मध्यमवर्ग यात) स्त्रीच्या स्थानाचे गौणत्व मान्य करण्याची सरंजामी वृत्ती गरीब शेतकऱ्यांच्या मानाने जास्त आहे. शेतकरी स्त्रिया स्वत: कष्ट करत असल्याने तेथे स्त्री स्वातंत्र्य व समानता यांच्या जुन्या परंपरांची पकड काही प्रमाणात टिकून आहेत.

## स्त्री मुक्तीचा अर्थ

सोप्या भाषेत सांगावयाचे तर **लिंगभेदावर आधारलेली श्रमविभागणी पूर्णपणे नष्ट करणे, हा स्त्रीची मुक्ती याचा अर्थ आहे.**

या प्रश्नाच्या दोन बाजू आहेत. पहिली म्हणजे **उत्पादन व राजकीय जीवन या क्षेत्रात स्त्रीचा संपूर्ण प्रवेश.** डाव्या चळवळीने अगदी सुरवातीपासून ह्या मुद्यावर भर दिला आहे. पण हे शक्य होण्यासाठी म्हणजे घराबाहेरील कार्यात स्त्रीची मुक्तपणे व संपूर्ण भागीदारी होण्यासाठी दुसऱ्याही बाजूवर भर दिला पाहिजे. ती बाजू म्हणजे घरकाम व शिशुसंगोपन यांच्या ओझ्यापासून स्त्रियांची मुक्तता झाली पाहिजे. म्हणजेच घरकामाचे सामाजीकरण केले पाहिजे. पाळणाघरे, शिशुसंगोपन केंद्रे, अन्नगृहे संघटित झाली पाहिजेत, विविध प्रकारच्या घरकामाचे यांत्रिकीकरण केले पाहिजे आणि घरकामात पुरुषांनी भाग घेतला पाहिजे.

## स्त्रीच्या मुक्तीबाबत मुख्य आउथळे

**कुटुंबाचे स्वरूप आणि लिंगभेदावर आधारलेली श्रमविभागणी ह्या गोष्टी वर्गनिविष्ट समाजामुळे ठरत असतात.** म्हणून स्त्रियाना जर स्वतंत्र व्हावयाचे असेल तर त्यानी सरंजामशाहीविरुद्ध भांडवलशाहीविरुद्ध आणि सामाजिक क्रांतीसाठी लढले पाहिजे. स्त्रियांचा लढा वर्गनिविष्ट समाजाविरुद्ध आहे. पुरुषांविरुद्ध नव्हे.

स्त्रियांचा मुक्तीलढा हा क्रांतिकारक लढा आहे. म्हणून जुना वर्गभेदाधिष्ठित समाज नष्ट केल्याशिवाय तो लढा जिंकता येणार नाही. जेव्हा स्त्रिया पूर्णवेळ रोजगार व समान पगार मागतात, जेव्हा त्या घर-

लौकीक संभाळण्याचा फारसा प्रश्न नसे. त्यामुळे स्त्रीला कुटुंबात कनिष्ठ स्थानाला डांबून ठेवणे आवश्यक नसे. शिवाय स्त्रियांच्या श्रमाची शेतात जरूरी असताना त्यांना घरात ठेवणे हे अशक्यही होते. यामुळे शेतकरी स्त्रियात आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्याच्या काही परंपरा तयार झाल्या. यात घटस्फोटाचा व पुनर्विवाहाचा हक्क इत्यादी गोष्टी येतात.

## भांडवली समाज

वरवर पाहता भांडवलशाही स्त्रियाना मोठ्या प्रमाणावर मुक्तता देते. कारण भांडवलशाही म्हणजे शेती मधील मागासलेपणाचा शेवट आणि आधुनिक पद्धतीने चालणाऱ्या उद्योगांची उभारणी. त्याचबरोबर सरंजामी परंपरांचा शेवट होतो आणि भांडवली लोकशाहीचा उदय होतो. परिणामी स्त्रियांच्यादृष्टीने भांडवशाही म्हणजे पितृसत्ताक कायदेशीर अधिकाराचा शेवट, वारशाचा नवीन हक्क, घटस्फोट व पुनर्विवाह यांचे हक्क, मतदानासारखे नागरीकत्वाचे कायदेशीर हक्क, वैवाहीक जीवनात समानतेचे नवीन आदर्श, नोकरीमध्ये पक्षपातास कायदेशीर बंदी आणि 'समान कामाबद्दल समान पगार' वगैरे अनेक गोष्टी येतात. हे सर्व छान दिसते आणि स्त्रियांना खरोखरच समानता प्राप्त झाली, असे भासते आणि पाश्चिमात्य भांडवली समाजात स्त्रियांना खरोखरच समान दर्जा आहे अशी बहुतेक भारतीयांची कल्पना असावी असे वाटते.

ही कल्पना अगदीच चुकीची आहे. अमेरिकेसारख्या विकसित भांडवली समाजाकडे आपण पाहिले तर आपणास असे दिसून येईल की तिसऱ्या जगातील अनेक देशांपेक्षाही राजकारण अथवा उद्योगधंदा ह्यात वरिष्ठ जागांवर असलेल्या स्त्रियांचे प्रमाण अमेरिकेत फार कमी आहे. भारतात स्त्री पंतप्रधान होती. अमेरिकेत स्त्रीला अध्यक्षपदावर निवडून आणणे अशक्य आहे. अमेरिकेत स्त्रिया कारखाने व कार्यालये यात मोठ्या प्रमाणावर काम करतात पण बेकारी आली की स्त्रियांच्या नोकऱ्या प्रथम जातात आणि पुरुषांच्या मानाने त्यांचे काम हलक्या दर्जाचे व कमी पगाराचे असते. पूर्ण वेळ काम करणाऱ्या स्त्री-कामगारांचे पगार हे पूर्णवेळ काम करणाऱ्या पुरूष कामगारांच्या पगाराच्या केवळ ५८% आहेत आणि अमेरिकेत बायकांना आजही दुसरी पाळी करावी लागते. म्हणजे कारखान्यात काम करून झाल्यानंतरही त्याना घरी काम करावे लागते. स्त्रियांना समानतेचे सर्व औपचारिक अधिकार मिळाले असले तरी घरकाम व शिशुसंगोपन हे स्त्रीचे पहिले कर्तव्य आहे, असे आजही म्हटले जाते.

अशा रीतीने अमेरिकेत व प्रत्येक भांडवली समाजात लिंगभेदावर आधारलेली श्रमविभागणी कायम रहाते आणि काही बाबतीत ती वाढते देखील.

भांडवलीपूर्व समाजात उत्पादनाचे बरेचसे कार्य हे घरातच केले जाई. शिंपी, भटारी, सुतार इत्यादी कारागिरांच्या बाबतीत त्यांचे घर व कामाची जागा ही पुष्कळदा एकच असे. शेतकऱ्याच्या दृष्टीनेही घर व शेत यात फारसा फरक नसे. म्हणून त्या काळात स्त्रिया काहीतरी उत्पादनकार्यात भाग घेत. पण भांडवलशाहीच्या उद्गमानंतर घर व कामाची जागा यात नवी फारकत निर्माण झाली. कामगार काम करण्यासाठी घराबाहेर कारखान्यात व कार्यालयात जाऊ लागले. उत्पादन घरापासून बाजूला केले गेले. अशा तऱ्हेने स्त्रिया या मुख्यतः घर व मुले याची काळजी घेणाऱ्या गृहिणी म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या तर पुरूष हे मुख्यतः पगारी मजूर म्हणून ओळखले जाऊ लागले आणि स्त्रिया जर कामासाठी घराबाहेर जाऊ लागल्या तर त्यांच्यावर बाहेरचे काम व शिवाय घरकाम याचा जादा बोजा पडू लागला.

**घरकामाचे भांडवलशाहीच्या दृष्टीने महत्त्व काय या प्रश्नाचे शास्त्रीय दृष्टीने उत्तर दिले जाणे महत्त्वाचे आहे.**

घरकाम म्हणजे घर, मुले व नवऱ्याच्या गरजा यांची काळजी घेणे. हे कामगार कारखान्यात अथवा कार्यालयात करत असलेल्या कामाएवढे महत्त्वाचे का समजले जात नाही? भांडवलशाहीत वस्तूंना 'मूल्य' असते, कारण त्या बाजारात विकल्या जातात. या अर्थाने घरकामाला मूल्य नाही. कारण स्त्रियांना त्याबद्दल पगार मिळत नाही. स्त्रिया करत असलेले काम हे पुनः पुनः करायचे व कधीही न संपणारे असते. तुम्ही धूळ झाडता व दुसऱ्या दिवशी ती परत येते; तुम्ही ताटे

शेतीच्या (ज्यावेळी नांगरट टोचणीने करत होते) सुरवातीच्या काळात स्त्रियांना फार महत्व असल्यामुळे सुरवातीच्या शेती-प्रधान समाजात स्त्रियांचा दर्जा बहुधा उच्चतम असावा. येथे आपल्याला **मातृसत्ताक** समाजांची उदाहरणे दिसून येतात. अशा समाजात स्त्रियांना पुष्कळदा राजकीय सत्ताधारी म्हणून स्थान असे व सामाजिक जीवनावर त्यांचे प्रभुत्व असे. सुरवातीच्या मानवसमाजात स्त्रियांना समानतेचे किंवा वरचढ स्थान होते. पण नंतर मात्र परिस्थिती बदलू लागली.

**वर्गसमाजाचा उगम**-दोन नवीन शोधांनी हा बदल घडून आला. एक म्हणजे नांगराचा शोध त्यामुळे व्यापक शेती करणे शक्य झाले. आणि दुसरा म्हणजे जनावरे माणसाळवणे मोठे कळप पाळणे आणि साठवून ठेवता येईल एवढे धान्याचे उत्पादन करणे शक्य झाल्यावर समाजात संपत्ती अथवा वाढावा निर्माण होऊ लागला.

ज्या माणसांना संपत्तीवर (वाढाव्यावर) ताबा मिळाला त्यानी स्त्रियांचाही ताबा घेण्याचा प्रयत्न केला. आपल्या मुलांना संपत्तीचा वारसा आपल्याकडूनच मिळेल, तो त्यांच्या आईकडून अथवा मामाकडून मिळणार नाही आणि कुटुंबामध्ये आपली सत्ता राहील, याची हमी निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी सुरू केला. आणि यात त्याना यश आले. अशा रीतीने पितृसत्ताक कुटुंबाचा जन्म झाला या पुढे संपत्ती, नाव व वारसा हा बापाकडून मिळू लागला. व बाप कुटुंब प्रमुख बनला.

## सरंजामी समाजरचना

शेतकरी व सरंजामदार ही सरंजामी समाजातील मूलभूत वर्गविभागणी असते. शेतकरी ज्या जमिनीवर राबतो त्या जमिनीवरील पिकांचा एक भाग त्याला जमीन ताब्यात असलेल्या सरंजामदारास द्यावा लागतो. सरंजामी समाजातील संस्कृती ही अधिकाराच्या पातळ्या व विषमता यावर आधारित असते. व्यक्तीला आपले वर्गीय स्थान हे जन्मातून प्राप्त होते. शेतकरी हे नेहमी शेतकरीच रहावयाचे, त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या सत्तेपुढे नेहमी मान तुकविली पाहिजे. योद्धे व सत्ताधारी हे फक्त उमराव कुळातील व्यक्तीचे होऊ शकतात. धर्म असे समज दृढमूल करतो. त्यांच्या पाठीशी धर्मगुरू उभा असतो. भारतामध्ये ब्राह्मणांनी वर्णाश्रम धर्माचा पुरस्कार करून सरंजामदारांना पाठिंबा दिला. ह्या धर्माप्रमाणे शेतकरी समुदायांनी (शुद्र) सेवा केली पाहिजे. राज्य करणे व युद्ध करणे हे क्षत्रियांचे काम आहे. ब्राह्मण धर्मगुरू व बुद्धिजीवी होत आणि व्यापार करणे हे वैश्याचे काम होय.

सरंजामदार हा शेतकऱ्यावर जसे प्रभुत्व गाजवी तसेच कुटुंबात तो स्त्रीचा संपूर्ण स्वामी असे. आपली संपत्ती, मत्ता व वंशवेल ही सुरक्षित असावी म्हणून स्त्रीच्या लैंगिक बाबीवर संपूर्ण ताबा असणे हे फार महत्वाचे होते. म्हणून दोन खानदानी कुळे एकत्र यावीत आणि त्यांच्या रक्ताची शुद्धता टिकावी म्हणून मुलींची लग्नेही लहानपणीच होत. सरंजामशाहीत स्त्रिया या सुरवातीला आपल्या पित्याच्या ताब्यात असतात, नंतर त्या आपल्या पतीच्या ताब्यात रहातात व अखेरीस त्या आपल्या पुत्राच्या ताब्यात रहातात. चीन–व्हिएटनाम ह्या देशात ह्यास 'त्रिविध आज्ञाधारकता' असे म्हटले जाई. धर्माचा वापर ते स्त्रियांचा दर्जा दुय्यम राहील यासाठी करत. पत्नी व माता एवढेच आपले स्थान आहे आणि नवऱ्याची सेवा करणे हे आपले सर्वश्रेष्ठ धार्मिक कर्तव्य आहे अशावर स्त्रियांचा निष्ठाभाव रुजेल अशा तऱ्हेने स्त्रियांची घडण केली जाई.

चीनमध्ये स्त्रियांचे पाय बांधण्याची पद्धत सर्वत्र पसरलेली होती. लहान पाय हे सौंदर्याचे लक्षण आहे या कल्पनेने स्त्रियांचे पाय लहानपणीच बांधले जात. पण घर सोडण्याचे स्वातंत्र्य स्त्रीला राहू नये, हा यामागील खरा हेतू होता. भारतात सतीच्या पद्धतीचा मोठा उदोउदो करण्यात येई. पतिपरायणता हे स्त्रीचे कर्तव्य आहे आणि म्हणून त्याचा मृत्यू झाल्याबरोबर स्त्रीनेही त्याच्याबरोबर सती गेले पाहिजे असे सांगण्यात येई. आणि खरोखरच विधवेचे जीवन हे एवढे दयनीय असे की स्वतःला जाळून घेण्याव्यतिरिक्त स्त्रीला पर्याय नसे.

तथापि शेतकरी व खालच्या जातींमध्ये परिस्थिती याहून वेगळी होती. गरीब शेतकऱ्यांजवळ आपल्या मुलांना देण्यासारखी संपत्तीच नसे आणि भारतातील खालच्या जाती अथवा इतर समाजातील खालचे थर यांच्यांसमोर स्वतःच्या कुटुंबाचे नाव अथवा सामाजिक

(पान ३ वरून)

त्यांचे नियंत्रण राहते आणि म्हणून त्यांना स्त्रियांवरही सत्ता प्राप्त होते. ज्यावेळी रोजगार कमविण्यासाठी म्हणून स्त्रिया घराबाहेर काम करतात त्यावेळी त्यांच्या बाबतीत भेदाभेद केला जातो. त्यांना कमी पगार दिला जातो, त्यांना नोकरी मिळण अवघड असते. त्यांना कनिष्ठ दर्जाची नोकरी मिळते आणि बेकारी वाढू लागली की त्यांची नोकरी प्रथम जाते. असे का होते? कारण स्त्रीची प्रथम जबाबदारी घर असे मानले जात आसल्याने तिची नोकरी काढून घेणे व तिला घरी पाठवणे, मालकांना सोपे जाते. आपले स्वत्व 'स्त्रिया' म्हणून आहे, कामगार म्हणून नाही, असे त्यांना जन्मापासून शिकवले गेले असल्याने कामगार म्हणून संघटित होण्यास व लढण्यास त्या धजावत नाहीत. म्हणून मालकांना पुरुषांपेक्षा स्त्रियांची पिळवणूक अधिक करता येते आणि पुरुष व स्त्री म्हणून असलेल्या भेदांचा कामगार वर्गात फूट पाडण्यासाठी उपयोग करण्यात येतो. ज्या स्त्रिया घराभाहेर काम करतात त्यांना शिवाय घरातही काम करावे लागते. त्या 'दोन पाळचा' करतात पण दुसऱ्या पाळीचा त्यांना पगार मिळत नाही. या सर्व कारणांमुळे कष्टकरी स्त्रियांचे खास प्रश्न हे लिंगभेदावर आधारलेल्या या श्रमविभागणीवर अवलंबून आहेत. घरकाम व शिशुसंगोपन या प्रश्नांना बगल देऊन वरील प्रश्नांची चर्चा करता येणार नाही

## लिंगभेदावर आधारलेल्या श्रमविभागणीचा उगम व विकास

पुरुष व स्त्री ह्यात जीवशास्त्रीय स्वरुपाचे भेद असल्याने लिंगभेदावर आधारलेली श्रमविभागणी निर्माण झाली काय?

नाही. मुलांना जन्म देणे व त्यांचे पोषण करणे ही गोष्ट फक्त स्त्रियाच करू शकतात. पण या खेरीज लिंगभेदावर आधारलेली श्रमविभागणी आवश्यक ठरेल, असे कोणतेही जीवशास्त्रीय कारण नाही. पुरुषांनी शिशुसंगोपन अथवा घरकाम करू नयेत, याला शारीरिक असे काहीही कारण नाही. तसेच स्त्रियांनी शास्त्रज्ञ, अभियंता, कलावंत, खाणकामगार, पोलाद कामगार अथवा सैनिक होऊ नये, यालाही काही शारीरिक कारण नाही. हे सर्व व्यवसाय स्त्रिया करत आहेत.

आपण जर निरनिराळे मानवसमाज पाहिले तर आपणास लिंगभेदावर आधारलेली श्रमविभागणी प्रचलित नसलेले टोळीसमाज अथवा आदिम साम्यवादी समाज आढळून येतात. तसेच अशी श्रमविगणी नष्ट केली जात असलेले समाजवादी समाजही आपल्याला दिसून येतात. ज्या समाजात शिशुसंगोपनाचे कार्य मुख्यत: पुरुष करतात असे समाज मानववंशशास्त्रज्ञांना त्यांच्या अभ्यासात आढळले आहेत. तसेच व्हिएतनामसारख्या देशात क्रांतिकारक लढ्याच्या काळात उत्पादन कामे व लष्करी मोहिमा यात स्त्रियांनी महत्वाची भूमिका पार पाडली असे दिसून येते.

**लिंगभेदावर आधारलेली श्रमविभागणी ही जीवशास्त्रामळे निर्माण झालेली नाही. ज्या वेळी समाजात वर्ग निर्माण झाले त्यावेळी ती अस्तित्वात आली. खरे म्हणजे बौद्धीक श्रम व शारीरिक श्रम या विभागणी बरोबरच हीही श्रमविभागणी वर्गसमाजाच्या अगदी सुरवातीस निर्माण झाली. आणि वर्ग नष्ट झाले की त्याचबरोबर श्रमविभागणीही नष्ट होऊ शकेल.** शिवाय निरनिराळ्या प्रकारच्या वर्गसमाजात, विशेषत: सरंजामी व भांडवली वर्गसमाजात कुटुंबाची भूमिका ही वेगवेगळी असते आणि लिंगभेदावर आधारलेली श्रमविभागणी वेगवेगळी स्वरुपे धारण करते.

**टोळी समाज अथवा 'आदिम साम्यवाद'**— या समाजात पुरुष व स्त्री हे दोघेही सामाजिक उत्पादनात भाग घेतात. या समाजातील श्रमविभागणीत थोडा फरक असतो. स्त्रिया बहुधा घराजवळ अन्न जमा करणे, मासे मारणे, शिकार करणे, असली कामे करतात तर दूर जाऊन मासे मारणे अथवा शिकार करणे ही कामे बहुधा पुरुष करतात. पण यात वर्गभेद नसतात आणि दोघांच्या अधिकारात फारसा फरक नसतो. घरकाम अथवा शिशुसंगोपन ही कामे पुरुषही करतात. यामुळे या समाजात लिंगभेदावर आधारलेली श्रमविभाणीग अस्तित्वात नसते असे म्हणता येईल.